# जलव्यवस्थापनातील उत्कृष्ट विहिर खजाना बावडी–बीड

डॉ.प्रशांत अ.साबळे,
सहाय्यक प्राध्यापक,इतिहास विभाग.
पद्मभुषण वसंतदादा पाटील महाविद्यालय, पाटोदा.



**प्रस्तावना :**

बीडचा इतिहास हा इसवी सन पुर्व काळापासून सुरू होतो. इसवीसन पुर्व काळापासून या भागात मानवी वस्ती होती. कारण आष्टी तालुक्यातील मायंबा गावाजवळील डोंगरामध्ये खोदण्यात आलेली अपूर्ण गुहा म्हणजे प्राचीन काळातील मानवाने लेणी खोदण्याचा केलेला अयशस्वी प्रयत्न म्हणावा लागेल. मानवाने या परिसरात नेमकी केव्हा वस्ती केली. याचे पुरावे मात्र सापडत नसले तरी या भागाचे पांडवकालीन नाव दुर्गावतीनगर व पुढे बलनी झाले, असा उल्लेख विश्वकोषात आढळतो. चालुक्य कालखंडापासून मात्र या भागाचा इतिहास ज्ञात असून चालुक्य राजा षष्टम विक्रमादित्याची बहिण चंपावती हिने हा प्रांत जिंकल्यानंतर तिने स्वतःचे नाव या भागास दिल्यावर चंपावती नगर या नावाने हा भाग ओळखला जाऊ लागला.[१] पुढे देवगिरीवर मोहम्मद बिन तुघलकांची सत्ता आल्यावर त्याने सन १३२६ मध्ये चंपावतीनगर हे नाव बदलून भिर असे फार्सी नाव या भागास दिले.[२] भिर म्हणजे या शब्दाचा अर्थ पाण्याचा प्रचंड साठा याच शब्दाचा पुढे अपभ्रंश होऊन आजचे बीड झाले आणि आजपर्यंत तेच नावाने या भागाला संबोधले जाते.[३]

प्राचीन आणि मध्ययुगीन कालखंडामध्ये बीड परीसरावर अनेक राजघराण्यांचे वर्चस्व होते, त्यामध्ये सातवाहन, वाकाटक, बदामीचे चालुक्य, राष्ट्रकुट, कल्याणीचे चालुक्य, यादव, खिलजी, बहामनी, आदिलशाही, निजामशाही या राजसत्तांनी अनेक वर्षे राज्य केले. १६३५ मध्ये मुघलांनी हा प्रांत जिंकून घेतला. काही अपवाद वगळता बहुसंख्य राजसत्तांचे पुरावे बीड जिल्हयात आज ही पाहावयास मिळतात. राष्ट्रकुट राजा उदयादित्याने खोदलेली अंबाजोगाई जवळील शिवलेणी, राष्ट्रकुट राजा तिसरा गोविंद नृपतीचे धारूरमध्ये सापडलेले ताम्रपट, चालुक्य राजा विक्रमादित्य षष्ठमने उभारलेले बीड शहरातील कंकालेश्वर मंदिर, मोहम्मद बीन तुघलकाच्या दाताची बीड जवळील कर्जनी येथील कबर, आदिलशाहीच्या काळात सरदार किश्तखानने बांधलेला धारूर किल्ला, मुघल आणि वेशी, स्मारके व शिलालेख या भागाचे ऐतिहासिक महत्व अधोरेखित करतात. या सर्व स्मारकात बीड शहराच्या पश्चिमेस पालीजवळ औरंगाबाद- सोलापूर हायवे लगत बीड पासून ४ कि.मी. अंतरावर अहमदनगरच्या निजामशाही कालखंडात मुर्तुजाशाह निजामच्या शासन काळात बांधलेल्या खजाना बावडीचे महत्व अनन्यसाधारण आहे.

वास्तविक पाहता या खजाना बावडी व नहरीचा आभ्यास या आगोदर अनेक इतिहास प्रेमी संशोधकांनी केलेला आहे. त्यामध्ये डॉ.सतिष सोळंके, डॉ. पठाण झेड.ए., श्री पोहनेरकर इत्यादी संशोधकांनी या स्मारकावर ओझरता प्रकाश टाकलेला असला तरी संशोधनकर्ताने प्रत्यक्ष या स्मारकाला भेट देवून या बावडीचे बांधकाम, रचना, तत्लाकीन उपयुक्तता व आजच्या सद्य स्थितीमध्ये जलसिंचनासाठी होत असलेला उपयोग याचा अहवाल यात मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

**उदिष्टेः–**

१.बीड परिसरातील मध्ययुगीन जलस्त्रोताचा शोध घेणे.
२.मध्ययुगीन जलव्यवस्थापनातील जलस्त्रोताचा अभ्यास करणे.
३.मध्ययुगीन जलसाठयाचे आजच्या दुष्काळी परिस्थितीतील उपयोजिता पाहणे.
४.मध्ययुगीन जलस्त्रोताची अभियांत्रिकी दृष्टीने महत्व तपासणे व जलसिंचनाच्या दृष्टिने होत असलेला उपयोग पाहणे.
५.मध्ययुगीन जलसाठा खजाना बावडीचे पुर्नजिवन करून पुन्हा ती जलसिंचना साठी आज सुध्दा किती उपयुक्त आहे हे समाजाच्या समोर मांडणे.

दक्षिणेच्या मोहितेहून परतलेला निजाम हुसेन शहा चांगलाच घायाळ झाला होता. अहमदनगरला येताच काही दिवसातच त्याचा मृत्यू झाला. त्याच्या जागी त्याचा मुलगा मुर्तजा शाह निजाम गादीवर बसला. मुर्तुजा शाह निजामने त्याच्या विश्वासातील

काही जणांची मंत्री म्हणून नियुक्ती केली व त्यांना जहागिरदारी दिली. त्यात बीडची जहागिरदारी सरदार सलाबतखानकडे आली. सलाबतखान हा मुर्तुजाच्या अत्यंत विश्वासातला मंत्री होता. तो मुळचा इराणचा होता. तो विकासप्रिय मंत्री होता. त्याने बांधलेले पक्के रस्ते, केलेले वृक्षारोपन, नगरांचे सुशोभिकरण आणि जनहितार्थ कामांमुळे तो लोकप्रिय मंत्री ठरला.[६] सलाबतखानने १५८२ मध्ये राजा भास्कर या वास्तु व भुजल शास्त्रज्ञाच्या मदतीने खजिना बावडी बांधली. बीड सुभ्याच्या विविध विकासकामांसाठी मुर्तजा शाह कडून आलेला सगळा खजिना या एकाच विहिरीच्या उभारणीत खर्च झाल्याने या विहिरीचे खजिना बावडी हे नाव पडले असा मतप्रवाह आहे. तर सगळा खजिना एकाच विहिरीवर खर्च झाल्याने निजाम चिडेल या भितीपोटी विहिरीचा वास्तुशास्त्रज्ञ राजा भास्करने आत्महत्या केली. राजा भास्करची समाधी आजही या भागात असून शेतकरी तिची पुजा करतात.

### • खजिना विहिर(बावडी)

बीड शहरापासून ४ कि.मी. अंतरावर दक्षिणेस मौजे आहेर वडगांव शिवारात मध्ययुगीन कालखंडातील पाय–यांची विहिर असून ही विहिर खजाना बावडी या नावाने प्रसिध्द आहे. ही विहिर आकाराने प्रचंड मोठी असून गोल आकाराची पुर्णपणे चिरबंदी दगडाने व चुन्यात बांधलेली आहे. या विहिरीत उतरण्यासाठी दक्षिण बाजूने पाय–या असून या पाय–याची संख्या १५ आर. प्रत्येक पायरीची २५० से.मी. लांबी असून १३ से.मी. उंची आहे. या बावडीचा टोचमाप नकाशा उपलब्ध झाला आहे.[७]

बीड शहराच्या नैऋत्य दिशेस असणा–या बलगुजार तरफेच्या शेतीसाठी जलीसिंचन हा या खजिना बावडीचा मुख्य हेतून बलगुजार या भागाचे मुळ नाव फार्सी भाषेत बर्ग–ए–झार हे होय. बर्ग–ए–झार म्हणजे फुला–पानांनी बहरलेली भुमी.[८] निजामशाहीच्या काळात सर्वसामान्य शेतक–याच्या शेतीसाठी जलसिंचनाचा किती गांभीर्याने विचार केला होता या चा पुरावाच जणु ही विहिर ठरली आहे. मध्ययुगातील जलसिंचन व्यवस्थेवर महत्वाचा प्रकाश टाकणारी खजिना बावडी अनेक आश्चर्य आपल्या गर्भात घेवून उभी आहे. महत्वाचे म्हणजे खजिना बावडी बांधल्याच्या दिवसापासून ते आजपर्यंत सव्वाचारशे वर्षानंतरही आपली वैशिष्टय टिकवून आहे. खजिना बावडी म्हणजेच भुगर्भातील जलस्त्रोत शोधण्याच्या तात्कालिक प्रगत विज्ञानाचा ठोस पुरावाच ठरतो. या विहिरीच्या पाण्याने आजही बलगुजारची जवळपास पाचशे एकर शेती भिजते आहे. याच विहिरीच्या पाण्याने बीड शहरातील खासबाग हा प्रसिध्द बगीचा उभा राहिल्याची नोंद आढळते. आज हा बगीचा नामशेष झाला असला तरी खजिना बावडीचे पाणी वाहणा–या नहरींचे अवशेष मात्र काळाच्या ओघातही टिकून आहेत.

खजिना बावडीचे अनेक वैशिष्टये आहेत. या वैशिष्टयांचा चिकित्सक अभ्यास केला तर मध्ययुगातल्या जलसिंचन पध्दत, जलस्त्रोतांच्या संशोधनाची पध्दत व जलसाठा पध्दतीवर फार मोठा प्रकाश पडू शकतो. या विहिरीचे आश्चर्य कारक वैशिष्टय असे की, २३.५ फुट खोल असणा–या या विहिरीचे पाणी कोणतेही उपकरण न वापरता ४ कि.मी. दुर असणा–या बलगुजारच्या शेतात जमिन स्तरावर येते. उपकरणाशिवाय विहिरीतले हे पााणी २३.५ फुट वर कसे आले असेल आणि त्या मागचे तंत्रज्ञान कोणते असावे हे अद्यापही अंधारच आहे. या विहिरीचे आश्चर्यकारक वैशिष्टय इथेच थांबत नाही तर सव्वाचारशे वर्षापूर्वी खोदलेल्या विहिरीचे पाणी अद्याप पर्यंत कधीच आटले नाही. आणि त्याचा जलस्तरही कधीच वाढला नाही हे विशेष. विहिर बांधल्यापासून आतापर्यंत या विहिरीत कायमपणे चार फुट पाणी आहे. शेकडो वर्ष अखंड वाहू शकणारा जलस्त्रोत शोधण्याचे तंत्रज्ञान निश्चितच आजच्या तंत्रज्ञानापेक्षाही प्रगत ठरते आणि उपग्रहाद्वारे जलसाठे शोधण्याच्या या युगात खजिना बावडीचे महत्व ठहकपणे नजरेत भरते. या विहिरीची रचना देखील वैशिष्टपूर्ण आहे. तिचे मोजमाप आपण पुढे पहाणार आहोत. विहिरीला तीन मोठे बोगदे(ज्याला ऊर्दुत नहर म्हणल्या गेले आहे.) आहेत. या नहरी ५ फुट उंच व २.५ फुट रूंद आहेत. या नहरीतून अखंडपणे ताशी ३७७ घनफुट वेगाने पाणी वहात असते. विहिरीची एक नहर नैऋत्य दिशेला दुसरी अग्नेय तर तिसरी उत्तर दिशेला वाहतेय. या तीन नहरीपैकी नैऋत्य व अग्नेय दिशेला वाहणा–या नहरी भुगर्भात ८१४० फुट लांब असून त्या शेवटी बंद केल्या गेल्या आहेत. या नहरी कोठेही उघडत नाहीत. मात्र उत्तरेकडील नहर ही जलसिंचनासाठीची खरी आणि मुख्य नहर असून ती खजिना बावडीच्या उत्तरेस ४ कि.मी. अंतरावरील बलगुजार शेतात जमीनस्तरावर उघडते. या स्थळास स्थानिक लोक फुटका नळ या नावाने ओळखतात.

खजिना बावडीच्या या मुख्य नहरीचे बांधकाम व स्थापत्यशास्त्र देखील तोंडात बोट घालायला लावणारे आहे. खजिना बावडी आणि खजिना बावडीची ही मुख नहर जिथे उघडी होते या ४ कि.मी. अंतरामध्ये विशाल पात्र असणारी बिंदुसरा नदी वहातेय. आज या नदीचे पात्र लहान व अवस्था शोचनिय असली तरी सव्वाचारशे वर्षापूर्वी या नदीचे रूप रौद्र आणि पात्रही विशाल होते. या नदीतून ताशी १०० कि.मी. वेगाने पाणी वहात असल्याचे हरिप्रसाद या इतिहासकाराने नमुद केले आहे.[९] या नदीला प्रलंकारी महापुर यायचे, पैकी आरबी तिथीनुसार जमदिल अव्वल १२,१८३० मध्ये आलेल्या विनाशकारी महापुरात नदीकाठच्या बुरूजास गेलेले तडे व त्यावरचा भंगलेला शिलालेख आजही नदीच्या विशालतेची साक्ष देतोय.[१०] अशा या वेगवान नदीच्या खालून २० फुट खोलीवर खजिना बावडीची मुख्य नहर ४ कि.मी. दूर बलगुजार पर्यंत आणली गेली आहे. हे अविश्वासनिय वाटत असले तरी सत्य आहे. विशेष म्हणजे बिंदुसरेचे हे काही मुळ पात्र नव्हे. मो.बीन तुघलकाने १३२६ च्या दरम्यान या नदीचे पात्र शहाराच्या पश्चिमेकडून पुर्वेकडे वळवले. एवढे मोठे पात्र वळवण्यासाठी कोणत्या तंत्राचा वापर तुघलकाने केला असेल हा आणखी एक नवा संशोधनाचा विषय होऊ शकतो. या वळवलेल्या पात्राच्याच खालून सन १५२८ मध्ये म्हणजेच तब्बल दोनशे वर्षानंतर या नदी खालून नहर काढण्याची किमया बीडचा जहागीरदार सलाबतखानने केली. विहिरीची नहर बीडकडे आणण्यात बिंदुसरा नदीचे विशाल पात्र आणि वेगवान प्रवाह या अडथळयावर मात करण्यासाठी तत्कालिन अभियंत्यांनी कोणत्या तंत्राचा वापर केला असेल आणि खालच्या स्तरातून वाहणा–या पाण्याला भुस्तरावर कसे काढले असेल...? आज अत्याधुनिक तंत्रज्ञानामुळे नद्यांना बांध घालणे, नद्या अडविणे किंवा त्यांचा प्रवाह बदलणे शक्य झाले आहे. पण मध्ययुगातल्या माणसांनी त्यासाठी कोणत्या तंत्राचा वापर केला असेल याचे उत्तर शोधताना मती गुंग होते.

विहिरीच्या नैऋत्य व अग्नेय दिशेच्या दोन नहरी जरी पुढे बंद होत असल्या तरी खजिना बावडीची वैशिष्टये शेकडो वर्षे टिकवून ठेवण्यात त्यांचा अत्यंत महत्वाचा वाटा आहे. भुगर्भात जवळपास ८१४० फुट लांब पसरलेल्या या नहरीमध्ये मोठया झ–यांचे जलस्त्रोत असावेत की ज्यामुळे खजिना बावडीत सतत पाणी पुरवठा होत रहातो आणि अतिरीक्त पाणी बलगुजारकडे मुख्य नहरीतून वाहते. या मुख्य नहरीला जवळपास चार कि.मी. अंतरापर्यंत भुगर्भातील अनेक झरे मिळत असावेत. कदाचित यामुळेच फुटक्या नळाला ४ फुटापेक्षाही जास्त पाणी असते. ही विहिर बांधणा–या अभियंत्याचे केवळ स्थापत्याशास्त्राविषयीच नव्हे तर भुजलशास्त्राविषयी देखील चांगले ज्ञान असावे. मुख्य नहरीच्या पाण्यास हवा व सुर्यप्रकाश लागावा तसेच प्रवाहात जर काही अडथळा आला तर तो दुर करता यावा या उद्‌देशाने विशिष्ट अंतरावर नहरीला झरोके करण्यात आले आहेत. उर्दु भाषेत याला हुसास म्हणल्या गेले आहे. नदीचे पात्र वगळता नहरीवर शेवट पर्यंत असे हुसास दिसतात. मात्र विहिरीच्या अन्य दोन नहरीवर असे हुसास नाहीत. कारण लांबवर पसरलेल्या झ–यातून पाणी मिळवून जलसाठा करणे व विहिरीची पातळी समान ठेवणे या मुख्य उद्‌देशासाठीच या नहरींचा वापर केला गेला आहे[११]

खजिना बावडी २३.५ फुट खोल असून ती दोन टप्प्यात विभागली गेली आहे. जमीनस्तरापासून १७.३ फुटावर १०.५ फुट रूंदीचा गोलाकार एक छान ऐसपैसे वरांडा असून त्यावर आपण वावरू शकतो. या गोलाकार वरांडयामध्ये मुळ विहिरीचा दुसरा टप्पा असून त्याची खोली ६.३ फुट आहे. ज्यात शेकडो वर्षापासून ४ फुट पाणी आहे. या गोलाकार विहिरीचा व्यासही दोन टप्प्यात विभागला गेलाय. विहिरीचा जमीनस्तरावरील व्यास १८.१५२ मिटर असून वरांडयापासूनच्या खाली दुस–या टप्प्याचा व्यास १२.३६१ मिअर आहे. जो या विहिरीचा मुळ व्यास म्हणायला हवा. विहिरीला पुर्वी नमुद केल्याप्रमाणे उत्तर, अग्नेय व नैऋत्य दिशांना ५ फुट उंच व २.५ फुट रूंद बोगदे अर्थात नहरी आहेत. विहिरीत उतरण्यासाठी पश्चिमेकडून दोन टप्प्यात पाय–या आहेत. पहिल्या टप्प्यात आरंभी मजबूत दगडी १४ पाय–या असून त्या ७.१० फुट रूंद व १० इंच उंच आहेत. तर दुस–या टप्प्यात वरांडयानंतर तीन पाय–या असून त्या थेट विहिरीत जातात.[१२]

बीड शहाराच्या विविध भागात जेव्हा जेव्हा पाणी टंचाई जाणवते तेव्हा तेव्हा आजही या विहिरीतून टॅंकरद्वारे पिण्याच्या पाण्याचा पुरवठा केला जातो. निर्माण दिवसापासून आजपर्यंत सतत सव्वाचारशे वर्षापासून आपले वैशिष्टय टिकवून ठेवणारे व सतत वापरात असणारे मध्ययुगातले महाराष्ट्रातले हे कदाचित एक मात्र स्मारक ठरायला हवे. या विहिरीच्या पश्चिमेला एक कबर असून त्यावर अलिकडच्या काळातला संगमरवरी दगडाचा शिलालेख होता. जो आज गायब असून त्यावर सदर कबर सलाबतखानची असून त्याने १५२८ मध्ये खजाना विहिर बांधल्याचा उल्लेख होता. सदर कबर सलाबतखानची खोटी कबर असून सलाबतखानाची खरी कबर अहमदनगर शहराच्या पुर्वेकडील डोंगरावर असून ती चांद बिबीका महल या नावाने ओळखली जाते. मात्र चांद बिबी आणि या स्मारकाचा अर्थाअर्थी संबंध नसून बीडचा जहागीरदार व मुर्तुजा शाह निजामाचा मंत्री सलाबतखान याची ही कबर आहे.[१३]

### • *बीड शहरातील कारंजा (टावर)*

खजाना विहिरीचे पाणी नहरीतून बीड शहारात आणण्यासाठी सलाबतखानने एक टॉवर (मनोरा) राजुरी वेस(द्वार) च्या पुर्वेला मिनारासारखे बनविलेले आहे. त्या टावरची उंची ४५ फुट असून खाली गोलाकार व्यास २५ फुट आहे.[१४] या इमारतीला कारंजा असे म्हटले जाते. या इमारतीमध्ये पुर्वी कारंजासारखे पाणी पडत असे. पुढे हे पाणी एका विहिर वजा हौदात सोडण्यात आलेले होते असे स्थानिक लोक म्हणतात. हेच पाणी बीड शहरातील लोक वापरत असत. मात्र आज पाहणी केली असता ही विहिर (हौद) अस्तित्वात नाही.

खजाना बावडीची व नहरीची सुक्ष्म पाहणी केल्यानंतर असे लक्षात येते की, या नहरीची रचना औरंगाबाद शहरातील थत्तेनहरीसारखीच आहे. थत्ते नहरीप्रमाणेच भुगर्भातील पाणी जमा करून ते खजाना विहिरीपर्यंत आणले असावे व पुढे शहराकडे हे पाणी नहरीद्वारे काही अंतरापर्यंत आणलेले असून पुढे कारंजाकडे आणताना खापरी पाईपलाईनचा वापर केलेला दिसतो. खापरी पाईपलाईनचे अवशेष आजही पहावयास मिळतात. त्यामुळे थत्तेनहर व या बीड शहरातील नहरीमध्ये साम्य आहे. परंतु खजाना बावडीचे अभियांत्रिकी व शुध्दशास्त्रपध्दतीने संशोधन झालेले नाही. तसेच ती पुर्णपणे दर्लक्षित झालेली आहे. त्यामुळे साहजिकच खजाना विहिरीमध्ये मोठया प्रमाणात गाळ साचलेला असून शहराकडे येणारी पाईपलाईन बंद आहे.

### • *समारोप व निष्कर्ष*

थोडक्यात मध्ययुगातील या वैशिष्टपुर्ण स्मारकाचा अनेक अंगाने अभ्यास करण्याची गरज आहे. जलस्त्रोत शोधण्याचे तत्कालिन तंत्रज्ञान कोणते असेल? या अभियंत्यांनी शेकडो वर्षे जलसाठयाचा स्तर स्थिर ठेवण्यासाठी कोणते कौशल्य वापरले असेल? कोणत्याही उपकरणाशिवाय विहिरीतील पाणी जमिनीवर व कारंजा टावरपर्यंत कोणत्या तंत्रज्ञानाचा वापर करून आणले असावे? अखंड व गतीने वाहणा–या नदीखालून बोगदा काढण्यासाठी कोणत्या तंत्रज्ञानाचा वापर केला असेल अशी शेकडो एकर जमिन कोणत्याही उपकरणाशिवाय पुढे असंख्य वर्षे भिजु शकेल अशा जमिनीचा स्तर बलगुजार भागातच असल्याचा शोध कोणत्या तंत्राने घेतला गेला असेल? या सर्व प्रश्नावर संशोधन होणे आवश्यक आहे. या प्रश्नावर संशोधन झालयास मध्ययुगातील जलस्त्रोत, संशोधनातील विज्ञान, जलसाठयाचे तंत्रज्ञान व पारंपारिक जलसिंचनाचे ज्ञान आजच्या भारतीय समजाला कळू शकेल. याचा फायदा हजारो मॅगावॅट विज वाजविण्यापुरताच नव्हे तर मराठवाडयाच्या कुशीत उपेक्षित असणारा सांस्कृतिक स्त्रोताचा हा खजिना वर्तमानाच्या जलसिंचन व जलस्त्रोत संशोधनाची दिशा बदलून टाकण्यासाठी ही उपयोगात येईल.

सद्यस्थितित खजिना विहिर अत्यंत दुर्लक्षित असून हा सांस्कृतिक खजिना नजरेआड झाल्यास समाजाची अपरिमित हाणी होणार आहे. विहिरीच्या पाण्यात सध्या शेवाळे वाढले असून मोठया प्रमाणात गाळ आहे. पर्यटक विहिरीत पॉलिथीनच्या पिशव्या

प्लॅस्टिकच्या बाटल्या व अन्न कचरा टाकून या अमुल्य ठेव्याला अनाहुतपणे धोका पोहचित आहेत. परिणामी विहिरीचे पाणी दुषित होवून ते वापरण्यासाठी योग्य राहिलेले नाही. पुरातत्व खात्याने विहिरीच्या उजव्या बाजूला संरक्षित स्मारक म्हणून लावलेला बोर्ड पुर्णपणे नष्ट झालेला आहे व तो विहिरीच्या सुरक्षीततेच्या दृष्टिने पुरेसा नाही. खजिना बावडी आज जरी मजबुत दिसत असली तरी तिला ना कोणी वाली, ना कोणी रखवालदार हि विदारक स्थिती भविष्यात या स्मारकाची मोठी हाणी होण्याचे संकेत देणारे आहे. एकीकडे देश पातळीवर पारंपारिक जलसाठे उजलस्त्रोत संशोधनासाठी राष्ट्रव्यापी मोहिम राबविली जात असताना बीड येथील खजाना बावडी सारख्या जलस्त्रोत, जलसाठा व जलसिंचनाच्या पारंपारिक तंत्रज्ञानाच्या खजिन्याकडे मात्र पुर्णपणे दुर्लक्ष होत आहे. याकडे महाराष्ट्र शासन, पुरातत्व विभाग, नगरपालिका यांनी विशेष लक्ष देणे आवश्यक आहे.

- *संदर्भसुची:–*


१.मराठी विश्वकोष, खंड–११ पृष्ठ १३६०.
२.मराठी विश्वकोष, खंड–११ पृष्ठ १३६३.
३.Gazetter of Beed. Maharashtra State, 1969 Page 422.
४.Gazetter of Beed. Maharashtra State, 1969 Page 423.
५ णजिल्हा बीड की तारीख–लेखकः हमीद नाथापुरी सन–१८६८, संदर्भःतारीख–ए–बीड, लेखकः का.झी.मो.कुतूबुल्हा, सन–१८६८ पृष्ठः ६४.
६.जिल्हा बीड की तारीख–लेखकः हमीद नाथापुरी सन–१८६८, संदर्भःतारीख–ए–बीड, लेखकः का.झी.मो.कुतूबुल्हा, सन–१८६८ पृष्ठः ६५.
७.जिल्हा बीड की तारीख–लेखकः हमीद नाथापुरी सन–१८६८, संदर्भःतारीख–ए–बीड, लेखकः का.झी.मो.कुतूबुल्हा, सन–१८६८ पृष्ठः ६६.
८.Gazetter of Beed. Maharashtra State, 1969 Page 424.
९ णजिल्हा बीड की तारीख–लेखकः हमीद नाथापुरी सन–१८६८, संदर्भः तारीख–ए–बीड, लेखकः का.झी.मो.कुतूबुल्हा, सन–१८६८ पृष्ठः ६८.
१०.श.न.पोहनेरकर, बीड १ वत्सल्यनगरी, प्रका. वैजिनाथ देवस्थान मंडळ,परळी वैजिनाथ, सन–२०००, पृष्ठः ३१.
११.श.न.पोहनेरकर, बीड १ वत्सल्यनगरी, प्रका. वैजिनाथ देवस्थान मंडळ, परळी वैजिनाथ, सन–२०००, पृष्ठः ३२.
१२.डॉ.सतिष सोळंके, बीड जिल्हयाचा प्राचिन मध्ययुगीन इतिहास, प्रका.बीड जिल्हा इतिहास परिषद, बीड. २०११, पृष्ठ ६३.
१३.डॉ.सतिष सोळंके, बीड जिल्हयाचा प्राचिन मध्ययुगीन इतिहास, प्रका.बीड जिल्हा इतिहास परिषद, बीड. २०११, पृष्ठ ६४.
१४.डॉ.झेड.ए.पठाण, यांचा शोधनिबंध, म.ई.प.खंड २५ पृष्ठः १०४.
१५.समुद्रगुप्त पाटील, यांचा शोधनिबंध, म.ई.प.खंड ५ पृष्ठः १०४.





*डॉ.प्रशांत अ.साबळे,*
*सहाय्यक प्राध्यापक,इतिहास विभाग , पद्मभुषण वसंतदादा पाटील महाविद्यालय, पाटोदा.*